International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA)
Multidisciplinary Peer-Reviewed Online Open Access Journal Impact Factor: 5.8
Volume 5, Issue 2, Apr-Jun 2025 ID: IJCRTA0000205 ISSN: 2583-1801
Email: ijcrta@gmail.com Website: www.ijcrta.org

# विकसित भारत २०४७ संकल्पात नांदेड जिल्ह्याच्या HDI विकासापुढील आव्हाने: एक संशोधनात्मक विश्लेषण

**प्रा. डॉ. प्रभाकर जाधव**

**Author Affiliation:**
सहयोगी प्राध्यापक तथा राज्यशास्त्र विभाग प्रमुख लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, धर्माबाद जि. नांदेड.
ईमेल: prabhakarjadhav70@gmail.com

**Citation of Article:** जाधव, पी. (2025). विकसित भारत २०४७ संकल्पात नांदेड जिल्ह्याच्या HDI विकासापुढील आव्हाने: एक संशोधनात्मक विश्लेषण. International Journal of Classified Research Techniques & Advances (IJCRTA) ISSN: 2583- 1801, 5 (2), pg. 42-47. ijcrta.org

**DOI: 10.5281/zenodo.17163754**

**सारांश (Abstract):**

*विकसित भारत २०४७ हा भारत सरकारचा महत्वाकांक्षी संकल्प आहे. ज्यात २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचे ध्येय आहे. या संकल्पात मानव विकास निर्देशांक (HDI) ही एक महत्त्वाची भूमिका बजावते, ज्यात आयुर्मान, शिक्षण आणि प्रति व्यक्ति उत्पन्न हे घटक समाविष्ट आहेत. नांदेड जिल्हा, महाराष्ट्रातील मराठवाडा प्रदेशातील एक कृषी-प्रधान आणि सीमावर्ती जिल्हा, HDI च्या दृष्टीने मागास आहे (सध्याचा HDI: ०.६०४). हा संशोधन पेपर नांदेडच्या HDI विकासापुढील प्रमुख आव्हानांचा (आरोग्य, शिक्षण, आर्थिक) अभ्यास करतो आणि विकसित भारत संकल्पाशी जोडून उपाय सुचवतो. डेटा महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२, NITI Aayog च्या SDG इंडेक्स आणि इतर संशोधन स्रोतांवर आधारित आहे. निष्कर्ष: सामूहिक प्रयत्नांद्वारे २०४७ पर्यंत HDI ०.७५०+ पर्यंत वाढ शक्य आहे.*

**संक्षिप्त शब्द (Keywords):**

मानव विकास निर्देशांक, नांदेड, विकसित भारत २०४७, मराठवाडा, विकास आव्हाने.

## प्रस्तावना (Introduction):

भारताने २०४७ पर्यंत $३० ट्रिलियन अर्थव्यवस्थेचे ध्येय ठेवले आहे. ज्यात भारताचा मानव विकास निर्देशांक हा जवळपास ०.८००+ पर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. नांदेड जिल्हा हा मराठावाड्यातील एक जिल्हा आहे. 2011 च्या जनगणनेनुसार या जिल्ह्याची लोकसंख्या सुमारे ३३ लाख आहे. हा जिल् भारत स्वातंत्र्यापूर्वी हैद्राबाद संस्थांनच्या निजाम राजवटीचा भाग होता. भारताच्या स्वातंत्र्यानंतर एक वर्षांनी हे संस्थान भारतात विलीन झाले. पूर्वी या भागाला मराठवाडा अशा नावाने ओळखला जात असे. तीच ओळख भारताच्या स्वातंत्र्यानंतर कायम ठेवली गेली. नांदेड हा

मराठवाड्याचा भाग असून मराठवाड्यातील सामाजिक धार्मिक सांस्कृतिक आणि राजकीय धार्मिक प्रभाव असलेला जिल्हा आहे. या जिल्ह्यात शेती आणि शेतीवरील रोजगार हा लोकांचा मुख्य व्यवसाय आहे.

भारताच्या मानवी विकास निर्देशांकासह महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक लक्षात घेता नांदेड जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाचा स्तर अत्यंत साधारण श्रेणीत राहिलेला आहे. सध्याचा मानव विकास निर्देशांक ०.६०४ असा असून तो महाराष्ट्र सरासरी ०.६४४ पेक्षा कमी असल्याने तो 'लो HDI' श्रेणीत आहे. सदरील संशोधन पेपर मध्ये २०४७ च्या संकल्पित विकसित भारताच्या विकास प्रक्रियेत नांदेडच्या मानवी विकास निर्देशांक पुढील कोणती आव्हाने आहेत. या आव्हानांचा शोध घेत त्याबाबतचे संशोधनावर आधारित विश्लेषण करत त्यास विकसित भारत संकल्पाशी कसे जोडता येईल याकडे लक्ष केंद्रित करण्यात येणार आहे.

**संशोधन पूर्व आढावा (Literature Review):**

महाराष्ट्र मानव विकास अहवाल २०१२ यानुसार, महाराष्ट्रामध्ये मानव विकास निर्देशांकाच्या प्रमाणांचा विचार केला तर ग्रामीण-शहरी विकासातील असमानतेमुळे अनेक जिल्हे विकासापासून खूप वंचित आहेत. अशा वंचित आणि मागास असलेला जिल्हा म्हणून नांदेडचा उल्लेख केला जातो . "Status of Human Development in Maharashtra: A District Level Analysis" (२०२०) मध्ये नांदेडला मध्यम मानव विकास निर्देशांकाच्या श्रेणीत ठेवले आहे. महाराष्ट्राच्या मानव विकास निर्देशांकाच्या सरासरीच्या विचार करता नांदेडचे स्थान कमी विकास दर असलेल्या नंदुरबार आणि गडचिरोली नंतर तो तिसरा आहे.

सदरील अहवालानुसार नांदेड जिल्हा हा मानव विकास निर्देशांकाच्या दृष्टिकोनातून कमी आहे. SDG इंडेक्स २०२३-२४ नुसार, नांदेडमध्ये गरीबी आणि कुपोषणाचे प्रमाण आजही उच्च आहे. देशातील विविध राज्यात जी जिल्हे मानव विकास निर्देशांकाच्या श्रेणीत निम्नस्तरावर आहेत अशा जिल्ह्यांसाठी भारत सरकारने काही विशेष धोरणे आखले आहेत. अशाच धोरणापैकी एक धोरण म्हणजे विकसित भारत २०४७ असे आहे."Viksit Bharat @2047: Challenges and Opportunities" (२०२४) या धोरणामध्ये जिल्हास्तरीय विकासासाठी समावेशक धोरणांची गरज अधोरेखित केली आहे. त्यासाठी मानव विकास निर्देशांकाच्या अध्ययनासाठी आरोग्य, शिक्षण, उत्पन्न अथवा राहणीमान या तीन घटकांना अधिक केंद्रित करण्यात आले आहे.

सदरील संशोधन पेपरच्या अध्ययनासाठी जी पद्धत (Methodology) वापरण्यात आलेली आहे ती पूर्णत: द्वितीय स्रोतांवर आधारित आहे. त्यासाठी जागतिक भारतीय आणि महाराष्ट्र या विविध स्तरावरील मानव विकास निर्देशांक यानुसार प्रकाशित झालेले विविध अहवाल, NITI Aayog डेटा आणि संशोधन पेपर्स हा अध्ययनासाठी वापरण्यात आलेला डेटा डेटा २०११-२४ पर्यंतचा आहे. सदरील अध्ययन विश्लेषण, गुणात्मक आणि तुलनात्मक (महाराष्ट्र सरासरीशी ) अशा स्वरूपाचे आहे. देशातील मागास भागांचा तसेच जिल्ह्यांचा मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी भारत सरकारने ज्या विकसित भारत २०४७ संकल्प केला आहे. त्या संकल्पनेची सदरील अभ्यास जोडण्यासाठी विथ विभागांचे अहवाल आणि रिसर्च पेपर यांचा अभ्यास करण्यात आलेला आहे.

**निष्कर्ष आणि चर्चा (Findings and Discussion):**

सदरील संशोधन पेपरच्या अध्ययनासाठी जे सत्यशोधन करण्यात येणार आहे. त्यासाठी आरोग्य शिक्षण आणि उत्पन्न त्यावर आधारित राहणीमान अशा तीन घटकांना अधिक केंद्रित करण्यात आले आहे. या तीन घटकांच्या सद्यस्थितीबाबतचा विचार करून त्याबाबतचे सविस्तर विश्लेषण लक्षात घेतले आहे. मानव विकास निर्देशांकासाठी आरोग्य हा एक महत्त्वाचा घटक आहे. मानवी कल्याण आणि सामाजिक कल्याणमध्ये आरोग्य क्षेत्रामध्ये आज काय आव्हाने आहेत त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न झालेला आहे. मानवी विकास निर्देशांकामध्ये आरोग्य या घटकात मानवी जीवनाचे आयुर्मान कशी आहे यावर मानव विकास निर्देशांकाची मोजमाप आधारलेले आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या सध्याच्या धकधकीच्या युगामध्ये आयुर्मान कमी झाले आहे. सध्या भारतीय लोकांचे आयुर्मान ६५ वर्षे असल्याचे विविध अहवालातून स्पष्ट झाले आहे.

तसेच यासाठी दुसरा एक महत्त्वाचा घटक म्हणजे जन्म माता मृत्यूदर हा आहे MMR च्या अहवालानुसार प्रति लाखाला ११३ माता मृत्यूदर आजही कायम आहे. त्याचबरोबर आरोग्यावर परिणाम करणारा घटक म्हणजे कुपोषण भारतामध्ये आजही कुपोषणाचे प्रमाण अधिक आहे तो प्रमाण विचारात घेतल्यास नांदेड जिल्ह्यामध्ये कुपोषणाचे प्रमाण 48 % असल्याचे दाखवण्यात आले आहे. नागरिकांचे आरोग्य आणि राहणीमान अधिक तंदुरुस्त असले पाहिजे यासाठी रुग्णांच्या प्रमाणात डॉक्टरांची सुविधा उपलब्ध असायला हवी.मात्र डॉक्टर-रुग्ण गुणोत्तर लक्षात घेतले तर आज ते १:१४५६ असे आहे. नांदेडच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रुग्णांची क्षमता ही एकूण पाचशे घाटांची आहे मात्र तिथे जवळपास एक हजार ते अकराशे रुग्ण दाखल होतात.

नांदेडचे वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय अधिक ओव्हरलोड झाले. त्यामुळे ऑक्टोबर 2023 मध्ये नांदेडच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात वैद्यकीय उपचारा अभावी एकाच दिवशी 24 बालकांचा मृत्यू झाला. ही घटना लक्षात घेता आरोग्य सेवेतील असलेल्या अभावांचा आणि कमतरतांचा असलेल्या आव्हानांचा एक मोठा अडथळा आहे असे लक्षात येते. आज मीतिला नांदेड जिल्ह्यामध्ये 12 ग्रामीण रुग्णालय सहा उपजिल्हा रुग्णालय आणि 70 प्राथमिक आरोग्य केंद्र आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या असलेला दवाखाना याबाबत जन आरोग्य अभियान या चळवळीने एक रिपोर्ट कार्ड तयार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये नांदेड जिल्ह्याच्या आरोग्य सेवे बाबतच्या अनेक कमतरता लक्षात आलेले आहेत. म्हणूनच नांदेड जिल्ह्यातील महत्त्वाची सेवा असलेल्या आरोग्य सेवे पुढे आजी मोठी आव्हाने आहे. पायाभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे आजही ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांमध्ये संक्रामक रोग (TB, मलेरिया) आणि NCDs (मधुमेह, हृदयरोग) चे उच्च प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. याचबरोबर निसर्गाकडून होणारी अतिवृष्टी अथवा दुष्काळ त्यामुळे निर्माण होणारे पर्यावरणाचे आणि प्रदूषणाचे प्रश्न आरोग्यास हानिकारक ठरत आहेत.

नांदेड जिल्ह्याच्या आरोग्य क्षेत्रात सध्या कालीन असलेली जी आव्हाने आहेत. या आव्हानावर मात करून त्यावर विविध उपाय शोधत असताना ते विकसित भारत २०४७ शी जोडले पाहिजेत. त्यासाठी भारत सरकारने आयुष्मान भारत आणि जल जीवन मिशन अशा लोकाभिमुख योजनांचा विस्तार वाढवून सामान्य जनतेला अधिक अधिक आरोग्य सेवा पुरून त्यांचे राहणीमान आणि आयुर्मान २०४७ पर्यंत ७५ पेक्षा अधिक वाढवण्याकडे लक्ष केंद्रित केले आहे.

नांदेड जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाचे मोजमाप करणारे दुसरे आयाम म्हणजे शिक्षण हे आहे. नांदेड जिल्ह्यातील सध्या कालीन शैक्षणिक परिस्थिती लक्षात घेता जिल्ह्यातील साक्षरता ही ६७-७०% जवळपास आहे आणि त्यामध्ये विशेषता महिलांच्या साक्षरतेचे प्रमाण ६०% पेक्षा कमी आहे. 2001 च्या जनगणनेनुसार नांदेड जिल्ह्यातील मुलींच्या शिक्षणाचे प्रमाण लक्षात घेता मुदखेड उमरी बिलोली धर्माबाद या तालुक्यात मुलींच्या शिक्षणाबाबत अनेक गंभीर प्रश्न पुढे आल्या आहेत. या परिसरातील मुलींना शिक्षण घेता यावे म्हणून भारत सरकारच्या सर्व शिक्षा अभियान अंतर्गत महाराष्ट्र सरकारने चार तालुक्यात कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय या निवासी शाळा आणि वस्तीग्रह काढून मुलींना शिक्षण देण्याचे प्रयत्न केले आहेत.

नांदेड जिल्ह्यातील शिक्षणाचे वर्गीकरण लक्षात घेता ते ग्रामीण आणि शहरी अनुदानित आणि विनाअनुदानित खाजगी आणि सरकारी अशी वर्गवारी करण्यात येते. नांदेड जिल्ह्यातील शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण लक्षात घेता विद्यार्थ्यांच्या प्रमाणात शिक्षकांची संख्या तुलनेने कमी आहे. शिक्षक आणि सुविधांचा अभाव, व्यावसायिक प्रशिक्षणाचा मोठ्या प्रमाणात अभाव आहे. ज्यामुळे बेरोजगारीचे प्रमाण ८-१०% वाढले आहे. नांदेड जिल्ह्यातील सध्याकालीन शिक्षणाची परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांचे मन मनगट आणि मेंदू बळकट करण्यासाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या शिक्षण व्यवस्थेत अनेक सुधारणा करण्याचे प्रयत्न होत आहेत. शिक्षण व्यवस्थेत असलेल्या अभावांना पूर्ण करून त्यांना विकसित भारत २०४७ शी जोडण्यासाठी समग्र शिक्षा अभियान, पायाभूत मूलभूत व सक्तीचे शिक्षण देत डिजिटल लर्निंगद्वारे अपेक्षित शिक्षणाचे प्रमाण वाढवले पाहिजे. त्याचबरोबर सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे शिक्षणातील ड्रॉप आउट कमी झाला पाहिजे. शिक्षणासह सर्वांना रोजगार मिळाला पाहिजे या भूमिकेकडे सरकारचे लक्ष वेधणे आवश्यक आहे.

मानव विकास निर्देशांकासाठी वापरला जाणारा तिसरा प्रमाण म्हणजे व्यक्ती आणि व्यक्तीचे उत्पन्न असे आहे. नांदेड जिल्ह्यातील मानव विकास निर्देशांकात नांदेड जिल्ह्यातील व्यक्तीच्या उत्पन्नाचे प्रमाण कसे आहे हा शोध लक्षात घेता प्रति व्यक्ति उत्पन्न प्रति व्यक्ति उत्पन्न महाराष्ट्र राज्याच्या सरासरीपेक्षा अर्ध्याने कमी आहे. तसेच नांदेड जिल्ह्यातील गरीबी ही आजही २०-२५% एवढी आहे. नांदेड जिल्ह्यातील बहुतांश लोकांचे आर्थिक जीवनमान हे त्यांच्या कृषी आणि शेतीवर अवलंबून असलेल्या रोजगारावर आहे. आणि विशेषता बहुतांश शेती ही निसर्गावर अवलंबून असल्यामुळे नांदेड जिल्ह्याची बहुतांश कशी व्यवस्था ही निसर्गाच्या बेभरवेशानुसार चालणारे आहे. म्हणून येथील दुष्काळ, शेती संकट, औद्योगिक अभाव, सीमावर्ती स्थलांतर यासारखे अनेक महत्त्वाचे प्रश्न याच कारणीभूत ठरतात. अशा प्रश्नावर मात करून नांदेड जिल्ह्यातील व्यक्तीचे आर्थिक उत्पन्न वाढण्यासाठी विकसित भारत २०४७ शी जोडले पाहिजे त्यासाठी सर्वप्रथम व्यक्तीला सर्वांगीण दृष्ट्या स्वावलंबी आणि आत्मनिर्भर होण्यासाठी शिक्षणासह रोजगार आणि उद्योगंधासह बाजारपेठ उपलब्ध करून दिली पाहिजे. त्यासाठी लघु मध्यम आणि उच्च उद्योग निर्णयातून प्रति व्यक्ती इन्कम वाढवण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

सध्या कालीन नांदेड जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाचा विचार करता HDI घटक | नांदेड (२०११-१२) नुसार आयुर्मान 65 वर्ष साक्षरता 67% आणि प्रत्येक उत्पन्न 82000 असे असल्याचे दर्शविण्यात आले आहे. या तिन्ही क्षेत्रातील असलेल्या अभावांचा आणि कमतरतांचा विचार करता 2047 पर्यंत या तिन्ही क्षेत्रातील विकासाचे प्रमाण वाढले पाहिजे त्यानुसार मानवी आयुर्मान 65 वरून 75 वर्ष साक्षरतेचे प्रमाण 67 वरून 85 टक्के तर प्रति व्यक्तीचे उत्पन्न

82000 दीड लक्ष रुपये होणे अपेक्षित आहे. महाराष्ट्र मानव विकास निर्देशांक २०१२ नुसार नांदेड जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांक पुढील आव्हाने लक्षात घेता विकसित भारत 2017 च्या दृष्टिकोनातून काही सुधारणा करणे अभिप्रेत आहेत..

**सुधारणा (Recommendations):**

सार्वजनिक कल्याण हा विषय सरकारी यंत्रणेकडे आहे. मानव विकास निर्देशांकात सुधारणा आणि विस्तार घडवून आणण्यासाठी सर्वच स्तरावर काम करणाऱ्या सरकारी यंत्रणेने आरोग्य शिक्षण आणि चांगल्या राहणीमानासाठी राष्ट्रीय डिजिटल हेल्थ मिशन, पोषण अभियान विस्तार नांदेड जिल्ह्याच्या शाश्वत विकासासाठी विकास पूरक पॅकेज निधीची उपलब्धता करून देऊन त्याद्वारे रुग्णालये/शाळा महाविद्यालयाचे बळकटीकरण करणे अभिप्रेत आहे. त्यासाठी युवकांना माहिती आणि तंत्रज्ञानाच्या आधारे विकसित होणाऱ्या नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून ग्रामीण आणि शहरी विकासातील अंतर कमी करता आले पाहिजे तरच भारतासह महाराष्ट्राचे आणि महाराष्ट्राचे नांदेड जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाचा स्तर हा आजच्या पेक्षा अधिक वाढण्यास सहाय्यता मिळेल. जो 2047 च्या 'विकसित भारत यासाठी ०.७५० पेक्षा अधिक वाढला पाहिजे तरच नांदेड जिल्ह्याच्या मानव विकास निर्देशांकाला अधिक मजबुती आणि बळकटी विकसित भारताच्या जडणघडणीत नांदेड जिल्ह्याच्या विकासाचा महत्वाचा वाटा राहू शकतो.

**निष्कर्ष (Conclusion):**

नांदेडसारख्या विकासापासून वंचित असलेल्या जिल्ह्यांच्या HDI मानव विकास निर्देशांकाचा स्तर सुधारल्याशिवाय २०४७ च्या विकसित भारताची संकल्पना पूर्णत्वास येऊ शकणार नाही. त्यासाठी सर्वांचे सामुहिक प्रयत्न होणे अभिप्रेत आहे.

**संदर्भ (References):**

1. Maharashtra Human Development Report 2012. Government of Maharashtra. https://mahasdb.maharashtra.gov.in/docs/pdf/mhdr_2012.pdf
2. Status of Human Development in Maharashtra: A District Level Analysis. ResearchGate, 2020. https://www.researchgate.net/publication/341903637_Status_of_Human_Development_in_Maharashtra_A_District_Level_Analysis
3. SDG India Index 2023-24. NITI Aayog. https://www.niti.gov.in/sites/default/files/2024-07/SDG_India_Index_2023-24.pdf
4. Viksit Bharat @2047: Challenges and Opportunities. ResearchGate, 2024. https://www.researchgate.net/publication/378610404_Viksit_Bharat_2047_Challenges_and_Opportunities
5. Developed India: Vision & Progress Towards 2047. Invest India. https://www.investindia.gov.in/team-india-blogs/developed-india-vision-progress-towards-2047
6. District Nanded Planning. Government of Maharashtra.

https://nanded.gov.in/en/planning/

7. Economic Survey of Maharashtra 2024-25. Directorate of Economics and Statistics.https://cdnbbsr.s3waas.gov.in/s349d4b2faeb4b7b9e745775793141e2b2/uploads/2025/01/2025030788773769.pdf

8. Viksit Bharat @ 2047- Governance Transformed. IIAS, 2025. https://darpg.gov.in/sites/default/files/Viksit_Bharat_2047_Governance_Transformed.pdf

9. Viksit Bharat 2047: Transforming Governance. Researchers World. https://www.researchersworld.com/index.php/rworld/article/download/2331/2173/3970

10. Innovate India: Viksit Bharat@2047. MyGov.
https://innovateindia.mygov.in/viksitbharat2047/